महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाच्या पुरवठा विभागातील पदांचे सेवा प्रवेश नियम अद्ययावत करण्याबाबत, तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाशी सबंधित काम केलेल्या सेवानिवृत्त सह/उप सचिव दर्जाच्या अधिका-याची करार पध्दतीने नियुक्तीबाबत जाहिरात**

अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाच्या पुरवठा विभागातील पदांचे सेवा प्रवेश नियम अद्ययावत करण्याबाबत, तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाशी संबंधित काम केलेल्या सेवानिवृत्त सह/उप सचिव यांची विहित अटी व शर्ती पूर्ण करणा-या अधिका-यांमधून करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी, या जाहिरातीद्वारे दिनांक २९ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) वयोमर्यादा : दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजी सेवानिवृत्त सह/उप सचिव यांचे कमाल वय ७० वर्षापेक्षा अधिक नसावे.

२) **अर्ज करण्याची पध्दत** :- इच्छुक व अर्हताप्राप्त अधिका-यांनी A-४ आकाराच्या कागदावर टंकलिखित करुन परिपूर्ण अर्ज टपालाद्वारे "अवर सचिव/नापु-११ (आस्थापना), खोली क्र.२१९ (विस्तार), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२" या पत्त्यावर दिनांक २९ ऑक्टोबर, २०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत पोहोचेल अशा बेताने पाठवावेत. त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जावर अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो स्वत: साक्षांकित करुन चिकटवणे आवश्यक आहे. अर्जाच्या लिफाफ्यावर ठळक अक्षरात " **करार पध्दतीने नियुक्तीबाबत अर्ज**" असे नमूद करावे.

अर्जात खालील बाबींचा समावेश असावा :- (आवश्यक कागदपत्रे जोडणे.)

१) शासन सेवेतील नियुक्तीपासून सेवानिवृत्तीपर्यंतच्या कालावधीत विविध विभागात केलेल्या सेवेचा तपशिल.

२) सेवानिवृत्तीचे आदेश.

३) वयाचा पुरावा.

४) वैद्यकीय प्रमाणपत्र

५) सेवानिवृत्तीच्या दिनांकावेळचे वेतन

६) विभागीय चौकशीबाबतचे प्रमाणपत्र

७) Conflict of interest जाहीर करणे.

३) <u>अटी व शर्ती :</u>

१) अधिका-यांची करार पध्दतीने करण्यात येणारी नियुक्ती ही अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबंधित उपरोक्त नमूद विवक्षित कामासाठीच असेल.

२) विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव आवश्यक.

३) सदर नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एक वर्षासाठी असेल. या नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करण्यात येईल. एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

४) अधिका-याने conflict of interest जाहीर करणे आवश्यक आहे.

५) सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नेमणूक करताना त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. अशा पारिश्रमिकाची कमाल मर्यादा मासिक रु.४००००/- (रु.चाळीस हजार) इतक्या मर्यादेत असेल.

६) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत /सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क रहाणार नाही.

७) करार पध्दतीने नियुक्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करावे. तसेच प्रस्तावित सेवेसाठी आवश्यक क्षमता असावी.

८) नियुक्ती कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिका-याची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र शासनास सादर करावे. सदर बंधपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती, करार पध्दतीवरील उमेदवारांकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही. याबाबतचा बंधपत्रात समावेश करुन सदर अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेख करण्यात यावा.

९) अधिका-यांविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी.

१०) नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याहीवेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार असतील.

११) नियुक्त झालेला अधिकारी त्यांच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेला नसावा.

१२) नियुक्त झालेल्या अधिका-यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

१३) करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक आहे.

१४) नियुक्त झालेल्या अधिका-याने त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे.

(वि.द.शेवडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.